# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०१/०१/२०१७

## *<u>कारवाफा येथे पोलीस विभागातर्फे भव्य युवा महोत्सवाचे चे उद्घाटन</u>*

आज दिनांक ०१/०१/२०१७ धानोरा तालुक्यातील कारवाफा येथे महाराष्ट्र पोलीस रेजींग डे निमीत्यांने पोलीस विभागाच्या वतीने युवा महोत्सव २०१७ चे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. शिवाजी बोडखे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सा़े., अपर पोलीस अधिक्षक श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उपअधिक्षक श्री. गणेश बिरादार, पेंढरी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश इंगळे, विस्तार अधिकारी श्री. वामन सावसाखळे, मिस हेरिटेज इंटरनॅशनल २०१४ च्या विजेत्या शीतल उपरे जिल्हा परिषद सदस्य श्रीमती शांताबाई परसे, कारवाफाच्या सरपंच श्रीमती प्रेमीलाताई कुंभरे, पोलीस पाटील श्रीमती रायपुरे आदी उपस्थित होते.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. शिवाजी बोडखे यांनी विद्यार्थ्यांनो स्वता:चे व्यक्तीमत्व चांगले बनवा असे सांगून यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. युवा महोत्सव सतत १२ दिवस चालणार असून विविध विषयांबाबत येथे तज्ञांकडून रोजगार विषयक मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच बँक खाते उघडण्याची मेळाव्यात सोय केलेली आहे. त्यामुळे गावातील सर्वांना बचतखाते काढून देण्यात येत आहेत.

तसेच पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, आदिवासी युवकांना जगाच्या संपर्कात आणण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. युवा महोत्सवाच्या माध्यमातून तरूणांना करियरच्या संधी जाणून घेण्याची संधी आहे. पोलीस विभाग केवळ एक साधन आहे. तुमच्यात असलेला आत्मविश्वाच्या बळावर तुम्ही समोर जाऊ शकता. मोठी स्वप्ने बघा शासनाच्या विविध योजना तुमच्या भविष्यासाठी उपलब्ध आहेत. या योजनांचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

तसेच मिस हेरिटेज इंटरनॅशनल २०१४ च्या विजेत्या शीतल उपरे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना करियर च्या संधी विषयी मार्गदर्शन केले.

मान्यवरांच्या हस्ते ज्ञानगंगा अभ्यासिका कक्ष, फिरते वाचनालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राजीव गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेझीम नृत्य व सांस्कृतीक कार्यक्रम सादर करण्यात आले. युवा महोत्सवाला मोठया संख्येने युवक-युवतींनी उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक पेंढरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश इंगळे यांनी केले. संचालन पोउपनि. अमोल वळसंग यांनी तर आभार शशीकांत लोंढे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठया संख्येने तरुण-तरुणी, गावकरी, विद्यार्थी उपस्थित होते. तसेच जास्ती-जास्त युवक-युवतींनी सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन पोलीस विभागातर्फे करण्यात आलेले आहे.






